महाराष्ट्र शासन
**पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,**
**मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर-431001.**
**दुरध्वनी क्रमांक 0240-2240591,फॅक्स क्र.0240-2240596**
**ई मेल :- cp.aurangabad@mahapolice.gov.in**

क्र.कक्ष-१०/का. शि.भरती-उमेदवार सुचना/२०२४/ 13918 छत्रपती संभाजीनगर,दि. २५.०८.२०२४

## कारागृह शिपाई पदाच्या लेखी परिक्षेस पात्र उमेदवारांकरिता सुचना

कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवरील 315 रिक्त कारागृह शिपाई पदांकरीता आवेदन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणी घेण्यात आलेली असुन सदर मैदानी चाचणीमध्ये उत्तीर्ण होवुन जाहिरातीमधील सामाजिक व समांतर आरक्षणानुसार 1:10 प्रमाणातील लेखी परिक्षेस पात्र उमेदवारांची यादी या कार्यालयाचे https://aurangabadcitypolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आलेली आहे.

लेखी परिक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा ही दि. 1.9.2024 रोजी खालील नमुद परिक्षा केद्रामध्ये घेण्यात येणार आहे.

| अ.क्र. | उमेदवार | परिक्षेचा दिनांक | परिक्षेचा वेळ व परिक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याची वेळ | लेखी परिक्षेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | **महिला उमेदवार** | दि. 01.09.2024 | **दुपारी 03.00 वा.**<br>**परिक्षा केद्रावर उपस्थित राहण्याची वेळ दुपारी 12.00** | महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी **(MIT)**, बीड बायपास रोड, सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर - 4310010. |
| 2 | **पुरुष उमेदवार** | दि. 01.09.2024 | **दुपारी 03.00 वा.**<br>**परिक्षा केद्रावर उपस्थित राहण्याची वेळ दुपारी 12.00** | मराठावाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, **देवगिरी महाविद्यालय,** रेल्वे स्टेशन रोड, विटस हॉटेल जवळ, छत्रपती संभाजीनगर- 431005. |

लेखी परिक्षेस पात्र असलेल्या उमेदवारांनी नमुद परिक्षा केंद्रावर नमुद तारखेस व वेळेवर उपस्थित रहाणे बाबत लेखी परिक्षेचे प्रवेश पत्र महाआयटी विभागाकडुन निर्गमित करण्यात आलेले आहे. सर्व उमेदवारांनी कारागृह शिपाई पदाच्या लेखी परिक्षेच्या प्रवेशपत्राची रंगीत प्रिंट काढुन घ्यावी.

लेखी परिक्षे करिता उमेदवारांनी लेखी परिक्षेच्या प्रवेश पत्रावर नमुद प्रमाणे त्या दिवशी, वेळेवर व परिक्षा केंद्रावर उपस्थित रहावे. लेखी परिक्षेकरिता उमदेवारांना दुपारी 12.00 ते दुपारी 02.00 वाजेपावेतो परिक्षा केद्रामध्ये प्रवेश देण्यात येईल. दुपारी 02.00 वाजेनंतर येणाऱ्या उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.

उमेदवारांना लेखी परिक्षेकरिता या कार्यालयाकडुन परिक्षा पॅड व ब्लॅक बॉल पेन पुरविण्यात येणार आहे. उमेदवारांनी लेखी परिक्षेकरिता येतांना सोबत लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र, मैदानी चाचणीचे प्रवेश पत्र व 2 पासपोर्ट फोटो (मैदानी चाचणी करिता जे आणलेले होते तेच) घेवुन यावे.

इतर कोणतेही किंमती वस्तु कॅल्क्युलेटर, स्मार्टवॉच, मोबाईल फोन, हेडफोन, ब्ल्युटुथ-हेडफोन व इतर इलेक्ट्रॉनिक वस्तु सोबत बाळगु नये. सदरचे उपकरणे उमेदवाराजवळ आढळुन आल्यास त्यांना भरती प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल. तसेच त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

**( शिलवंत नांदेडकर )**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर.